# तळेगाव दशासरमध्ये अनैतिक संबंधातून हत्या

**प्रियकराने प्रेयसीच्या पतीला संपविले**

**मृतदेह रस्त्यावर फेकून अपघाताचा बनाव**

**आरोपीला दोन तासांत अटक**





**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, दि. ( 30 )** – अनैतिक संबंधात अडसड ठरत असलेल्या प्रेयसीच्या पतीची प्रियकराने लोखंडी पाईपने डोक्यावर प्रहार करुन हत्या केली. हत्येनंतर आरोपीने मृतदेह रस्त्यावर फेकला आणि अपघाताचा बनाव रचला होता. मात्र सकृतदर्शनीच ही हत्या असल्याचे स्पष्ट झाल्याने पोलिसांनी त्यादिशेने तपास सुरु केला आणि आरोपीला घटना समोर आल्यापासून दोन तासांच्या आत अटक करण्यात यश प्राप्त केले. या घटनेमुळे तळेगाव दशासर आणि परिसरात खळबळ उडाली आहे. मनोज वामनराव नागपूरे (40, तळेगाव दशासर) असे मृतकाचे नाव आहे. त्याचा मारेकरी उमेश शिवा शिंदे याला पोलिसांनी अटक केली असून त्याने आपला गुन्हा कबुल केला आहे. मनोजच्या पत्नीसोबत आपले अनैतिक संबंध होते, त्यात मनोज अडचण ठरत असल्याने आपण मनोजची हत्या केल्याचे उमेश शिंदेने पोलिसांना सांगितले आहे.

प्राप्त माहितीनुसार तळेगाव दशासर येथील रहिवासी असलेल्या आरोपी उमेश शिंदे याचे मृतक मनोज नागपुरे याच्या पत्नीसोबत अनैतिक संबंध होते. त्यात मनोज नागपुरे हा अडचण ठरत होता. मनोजची अडचण दूर करण्यासाठी टोकाचे पाउल उचलून त्याची हत्या करण्याचा निर्णय उमेश शिंदेने घेतला. काल, बुधवारी, रात्री दारु पिण्याच्या बहाण्याने उमेश शिंदेने मनोज नागपूरेला बोलावले. तो मनोजला गावापासून लांब निमगव्हाण मार्गावर घेउन गेला. तेथे लोखंडी पाईपने डोक्यावर प्रहार करुन उमेशने मनोजची हत्या केली. मनोजची हत्या केल्यानंतर त्याचा रक्तरंजित मृतदेह उमेशने स्कुटी या दुचाकीवरुन त्याच मार्गाने गावापासून आणखी लांब भवानीमाता मंदिराजवळ नेला. तेथे रस्त्यावर मृतदेह फेकून दिला. मनोजचा अपघातात मृत्यु झाला, असा दिखावा निर्माण करण्याचा उमेशचा हेतू होता.

याबाबत माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठले. प्रथमदर्शनीच मनोज नागपूरेची डोक्यावर प्रहार करुन हत्या करण्यात आल्याचे स्पष्ट झाले होते. त्यादिशेनेच पोलिसांनी तपास सुरु केला. दरम्यान काल रात्री उमेश शिंदे हा मनोजला दारु पिण्यासाठी सोबत घेउन गेला होता, अशी माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी उमेश शिंदेला ताब्यात घेउन चौकशी केली. त्याने सुरुवातीला मनोजचा मृत्यु अपघातात झाल्याचे सांगितले. पोलिसांनी उमेशची स्कुटी बघितली असता, ती सुस्थितीत होती. अपघाताच्या कोणत्याही खूना आढळून आल्या नाही. तेव्हा पोलिसांनी उमेशची आणखी कसून चौकशी केली. तेव्हा त्याने आपण मनोजचा खून केल्याचे मान्य केले व संपूर्ण घटनाक्रम पोलिसांना सांगितला.

मृतक मनोजची पत्नी आणि आरोपी उमेश यांच्यात अनैतिक संबंध होते. तसे स्वतः उमेशनेच पोलिसांना सांगितले. आपल्या संबंधात मनोज अडचण ठरत असल्याने त्याची हत्या केल्याचे आरोपी उमेशने कबुलीजबाबात म्हटले आहे. या घटनेमुळे तळेगाव दशासर व परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे. ठाणेदार धोंगडे, पीएसआय सागर हटवार, मो. सलीम आणि अन्य याप्रकरणाचा तपास करित आहेत. ग्रामीण गुन्हे शाखेचे निरिक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात पोलिसांनी अवघ्या दोन तासांत या हत्या प्रकरणाचा छडा लावला.



## अमरावतीमधील दोन सावकार भावंडाकडे धाड

**अनेक आपत्तीजनक दस्तावेज केले जप्त**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 )**– शहरातील दोन सावकार भावंडांकडे उपनिबंधक कार्यालय (सहकारी संस्था) कडून धाड टाकून अनेक आपत्तीजनक दस्तावेज जप्त करण्यात आले आहे.

मुकुंद काशीराव पुसदकर (रा. फ्लॅट क्र.2 विजयानंद अर्पाटमेंट, सामरा नगर, गल्ली क्र.4 जूना बायपास रोड अमरावती), प्रकाश काशीराव पुसदकर (रा.हरीओम कॉलनी, विठ्ठल मंदीराजवळ, अमरावती) असे दोन्ही सावकर बाधवांचे नावे आहेत. या कथित सावकारांविरुध्द प्राप्त तक्रार वरुड सहायक निबंधकांनी उपनिबंधक कार्यालयाला वर्ग केली होती. जिल्हा उपनिबंधक स्वाती गुडधे यांनी तत्काळ दोन पथके तयार करुन राजापेठ पोलीस स्टेशन हद्दीतील या दोन्ही ठिकाणी धाड टाकण्याची कारवाई केली. सकाळी 10.45 वाजता सुरु करण्यात आलेली ही कारवाई दुपारी 2.30 वा. पुर्ण झाली. पथकाने येथून कोरे स्टॅम्प पेपर, ईसार चिठ्ठी, स्थावर मालमत्ता खरीदी खत, स्वाक्षरी असलेले कार धनादेश, उसनवार रक्कम दिल्याची पावती, असे एकुण 19 जप्त केले. या कागदपत्रांच्या पडताळणी नंतर पुढची कारवाई करण्यात येईल.

## संस्कृतीच्या मृत्यूचे गुढ अजूनही कायम

**पोलिसांना पीएम रिपोर्टची प्रतिक्षा**



**महासागर प्रतिनिधर**


**अमरावती, ( दि. 30 )**– तपोवन परिसरातील जिजाऊ नगरात मंगळवारी(दि.28) रात्री पोलीस कर्मचाऱ्याच्या 25 वर्षीय संस्कृती नामक मुलीचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली होती. या प्रकरणी पोलिसांनी सध्या आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. मात्र संस्कृतीचा संशयास्पद मृत्यू झाल्याने पोलीस आता शवविच्छेदन अहवालाची वाट पाहत आहेत. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

खल्लार पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी संजय राऊत यांचे अमरावतीत तपोवनात परिसरात जिजाऊ नगर येथे निवासस्थान आहे. त्यांच्यासह कुटूंबात पत्नी आणि दोन मुली असून 29 जानेवारीला संध्याकाळी संजय राऊत यांची पत्नी आणि दुसरी मुलगी कामानिमित्त बाहेर गेल्या होत्या. मात्र रात्री नऊच्या सुमारास घरी परतल्यावर मुलगी संस्कृती घरातील चटईवर पडलेली दिसली. संस्कृतीच्या तोंडातून आणि नाकातून रक्त येत असल्याचे दिसत होते. ही माहिती तत्काळ गाडगेनगर पोलिसांना देण्यात आली. गाडगेनगर चे ठाणेदार ब्रह्म गिरी यांच्यासह पोलीस उपायुक्त सागर पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त अरुण पाटील यांनी घटनास्थळ गाठून अधिनस्त कर्मचाऱ्यांना आवश्यक दिशानिर्देश दिले होते.

दरम्यान आता संस्कृतीच्या कुटुंबीयांची पोलिसांकडून चौकशी सुरू आहे. याशिवाय मोबाईल कॉल डिटेल्सचीही तपासणी केली जात आहे. मात्र अद्याप तपासात काहीही समोर आलेले नाही.

## धावत्या ट्रकने घेतला पेट

**अमरावती-नागपूर महामार्गावरील घटना**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 )**– राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 6 वर अमरावती येथून नागपूरकडे कोळसा घेऊन जाणाऱ्या ट्रकने बुधवारी (दि.29) भिष्णूर फाटा येथे अचानक पेट घेतला. घटनेची माहिती मिळताच तळेगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या बंबांना तत्काळ घटनास्थळी पाचारण करून आग आटोक्यात आणण्यात आली.सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मात्र, ट्रकचे मोठे नुकसान झाले आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. काही काळ महामार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. पोलिसांनी वेळीच धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. घटनेचा पुढील तपास तळेगाव पोलीस करीत आहे.

## नागपूरी गेट पोलिसांकडून तडिपाराला अटक

**अमरावती** – नागपुरी गेट पोलिसांनी बिस्मील्लानगरातून एका तडिपार आरोपीला 28 जानेवारी रोजी रात्री अटक केली. मोहम्मद अनस मोहम्मद सादिक (25, रा. बिस्मील्लानगर) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरुध्द कलम 142 अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी कोंबिग ऑपरेशनदरम्यान ही कारवाई केली. गुप्त माहितीवरून पोलिसानी बिस्मील्लानगरात जाऊन पाहणी केली असता, तेथे तडिपार आरोपी मोहम्मद अनस हा अनस टि स्टॉलजवळ फिरताना दिसला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने तडिपार आदेशाचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले.

## जेएसडब्ल्यु नावाने बनावट टिनपत्र्याची विक्री

**आरोपीविरुध्द कॉपी राईट कायद्यान्वये गुन्हा दाखल**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.30 )** – जेएसडब्ल्यु या नामांकीत कंपनीच्या टीनच्या नावाने बनावट टिन पत्रे विक्री केल्या जात असल्याच्या प्रकार अमरावती शहरात उघडकीस आला. आहे. याप्रकरणात परशुराम सुखदेव कारंड (40, रा. लोकमान्य नगर, ठाणे) यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी 29 जानेवारी रोजी आरोपी त्रिभुवन किसनलाल देवाडिया (67, रा. विद्या कॉलनी, कॅम्प, अमरावती) याच्याविरुध्द कलम 51, 63 कॉपीराईट कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे. परशुराम सुखदेव कारंड हे बनावट माल विक्रेत्यावर कार्यवाही करण्याचे कर्तव्य बजावतात. त्यांना माहिती मिळाली होती की, वलगाव रोडवरील एका ठिकाणी बनावट थिनर केमिकल विक्री होत आहे. या माहितीवरून, त्यांनी गाडगेनगर पोलिसांच्या मदतीने वलगाव रोडवरील बंद पडलेल्या असोरीया पेट्रोल पंपाजवळ जाऊन तेथील एका टिनाच्या गोदामात जेएसडब्ल्युचे पत्रे व टीन विक्रीस आहे का, असे विचारले. त्यावेळी त्याने गोदामातील एका कोपर्यातील टिने दाखविली. त्यानंतर परशुराम कारंड व कंपनीचे वरिष्ठ अधिकारी यांनी टिनावरील लाईनर मार्किंग व टिनावरील गुणवत्ता व कलरची पाहणी केली असता, त्यात विसंगती आढळून आली. त्यावेळी कंपनीच्या अधिकार्यांनी नेहमीच्या पध्दतीने थिनर केमिकलचे परिक्षण केले असता, ते जेएसडब्ल्यू कंपनीचे नसल्याची खात्री पटली. त्यानंतर तेथील 12 फुट लांबीचे 16 नग टिनाचे (19840 रुपये किमंत) परिक्षण करण्यात आले असता, ते सुध्दा कंपनीचे नसल्याचे दिसून आले. त्यामुळे परशूराम कारंड यांनी या घटनेची तक्रार गाडगेनगर पोलिसात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी त्रिभुवन देवाडियाविरुध्द गुन्हा नोंदविला.

## सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**अमरावती** – जिल्हास्तरीय लोकशाही दिन दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार फेब्रुवारी महिन्याचा लोकशाही दिन, सोमवार, दि. 3 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिक्षक निलेश खटके यांनी केले आहे.



## पीकअप वाहनाच्या अपघातात चौघे जखमी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 )**– मजूर घेऊन जाणारे भरधाव पीकअप वाहन पलटी होऊन चार जण गंभीर जखमी झाल्याची घटना (दि.29) जामलीजवळील जामगड नदीजवळ घडली.

श्याम बेठेकर, प्रमोद सुखराम कासदेकर (40), जसोदा प्रमोद कासदेकर (30), योगेश बेठेकर (27 रा. कावळाझिरी), धर्मेन्द्र मकाराम मावसकर (23, सावऱ्या) यांचा जखमींमध्ये समावेश आहे.धारणीकडून मजूर घेऊन जाणारे महिंद्रा पीकअप वाहन क्रमांक एमएच 47/के 2987 हे भरधाव वेगाने जात होते. दरम्यान जामगड नदीजवळ वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने पीकअप वाहन अनियंत्रित होऊन पुलाखाली पलटी झाले. त्यात चार जण गंभीर जखमी झाले, तर इतरांना किरकोळ मार आहे.जखमींना प्राथमिक आरोग्य केंद्र टेब्रूसोंडा येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.प्राथमिक उपचार करून उपजिल्हा रुग्णालय अचलपूर येथे रेफर करण्यात आले.

# अमरावतीचे अविकासाचे दारिद्र्य दूर करावे!

**जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून व्हावे काम | दिनेश सुर्यवंशी यांची पत्रकार परिषद**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 )**– महाराष्टात महायुतीचे भक्कम सरकार स्थापन झाले आहे. विकासाच्या अनेक आघाड्यांवर महाराष्ट्र आगे कूच करत आहे. अमरावती शहर व अमरावती जिल्हा यासहित पश्चिम विदर्भात मोठ्या प्रमाणावर विकासासाठी वाव आहे. वरील पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा शुक्रवारी अमरावती दौरा आहे. या दौऱ्यातून तशी आखणी होवून जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून अमरावती शहरातील अविकासाचे दारिद्र्य दूर करावे अशी रास्त अपेक्षा भाजप नेते दिनेश सुर्यवंशी यांनी एका पत्रकार परिषदेतून व्यक्त केली.

सुर्यवंशी पुढे म्हणाले की, पालकमंत्री बावनकुळे हे कार्यकर्ता मानसिकतेचे नेते आहेत व अतिशय कष्टाने जमिनीवर काम करत करत पुढे आलेले नेतृत्व आहे. सध्या राज्याच्या मंत्रिमंडळात व पक्षाच्या विविध मोठ्या जबाबदारी सांभाळत असल्यामुळे त्यांना विकासाच्या संदर्भात व कार्यकर्ता आणि जनतेच्या भावना माहित आहेत. शुक्रवारी होवू घातलेल्या जिल्हा नियोजन समिती बैठकीत तसेच याच अनुषंगाने आयोजित केलेल्या प्रशासकीय बैठकांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर अमरावती शहर व जिल्ह्याच्या सोबतच विभागीय केंद्र असल्यामुळे पश्चिम विदर्भाच्या ही विकासाच्या संदर्भातील निश्चित धोरण निर्णय आखले जावेत अशी मागणी प्रदेश संयोजक तथा प्रदेश कार्यकारणी सदस्य भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश प्रा.दिनेश सूर्यवंशी यांनी केली आहे.

### पालकमंत्र्यांसमोर मांडणार हे मुद्दे

- जिल्ह्याला विविध विभागांच्या माध्यमातून प्राप्त होणाऱ्या निधी चा अत्यंत परिणामकारक उपयोग करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्यात यावी
- होऊ घातलेला पीएम मित्रा टेक्सटाइल पार्क. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प एका ठराविक वेळेत कार्यान्वित करण्यासाठी कर्तबगार अधिकाऱ्यांची टीम नेमावी
- नवी मुंबई परिसरात उभारल्या जाणाऱ्या अनेक डेटा सेंटर पैकी काही डेटा सेंटर हे अमरावतीत उभारले जावेत. यासाठीचे धोरण व कृती कार्यक्रम महाराष्ट्र राज्याच्या उद्योग विभागाला व मुख्यमंत्र्यांकडे कळविण्यात यावा.
- मेळघाट मध्ये दूध उत्पादनाला मोठ्या प्रमाणावर वाव देण्याकरिता केंद्रीय गृहमंत्र्यांच्या घोषणेप्रमाणे अमुल अथवा मदर डेअरी च्या सहकार्याने एक दूध प्रकल्प सुरू करण्याचे तातडीने व्हावे.
- नया अकोला येथे ठेवले आहेत त्या ठिकाणाला तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पावन स्मृतीचे जतन करणारे अध्ययन केंद्र उभारण्यात यावे.
- मध्यम वर्गवारितील महिला वर्गाकडून संचालित होणाऱ्या तीन मध्यम उद्योगांची उभारणी करण्यासाठी आवश्यक ती तरतूद जिल्हा नियोजन समितीच्या वतीने व राज्याच्या उद्योग विभागाच्या वतीने व्हावी.
- अमरावती येथे विद्यार्थ्यांना अत्यावश्यक असलेल्या इंटर्नशिप व कौशल्य विकासासाठीचे मार्गदर्शन करणारे तसेच या केंद्राच्या माध्यमातून विदर्भ मराठवाडा नाशिक पुणे व मुंबई यातील अनेक उद्योग क्षेत्रातील तसेच मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या व्यापारी केंद्रातून इंटर्नशिप देण्याचे कार्य सुरू व्हावे.
- पावसाच्या पाण्याचे नीट नियोजन करण्यासाठी या जिल्हा नियोजन आराखड्यात व पालकमंत्री या नात्याने जलसंपदा विभागाकडे मेळघाट व अन्य भागात आवश्यक ती धरणे व पाणी अडवण्यासाठीचे प्रकल्प यासाठी पुरेशी तरतूद करण्यात यावी.
- मेळघाटातील जनता ही विकासाच्या बाजूनेच उभी आहे व या जनतेचे काही मूलभूत प्रश्न यात अखंडित वीज पुरवठा करण्यासाठी आवश्यक वीज उपकेंद्र तातडीने उभारण्यासाठी आगामी अर्धसंकल्पात भरीव तरतूद करावी.
- असंघटित कामगारांच्या हिताच्या दृष्टीने कामगार विकास केंद्र स्थापित करण्यासाठी ची योजना व तरतूद करण्यात यावी.
- सर्वसामान्यांचा सहकार्याकरिता पालकमंत्री कार्यालयात संवेदनशील व जबाबदारीने व्यवहार करणारे अधिकारी कर्मचारी नेमण्यात यावे.

महाराष्ट्र शासन

**जलसंपदा विभाग**

**कार्यकारी अभियंता, प्रमुख द्वार उभारणी पथक क्र.2. लिंक रोड सदर, नागपुर**

**दुरध्वनी क्र. 0712-2522498** **ई-मेल :-ee.cgeuw.ngp@gmail.com**

**निविदा सूचना क्रमांक 26 सन 2024-25**

कार्यकारी अभियंता, प्रमुख द्वार उभारणी पथक क्र.2, नागपूर, (दुरध्वनी क्र. 0712-2522498) हे महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाच्या वतीने सक्षम निविदाकारांकडून खालील कामांसाठी ब-1 (टक्केवारी दराने) ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई-निविदेबाचत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याच्या अधिकार अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, नागपूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल. महाराष्ट्र शासन जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/1117/प्र.क्र.104/17/यांत्रिकी दि. 14.03.2018 अन्वये खालील कामांकरीता निविदा सादर करणारे कंत्राटदार, जलसंपदा विभागातील यात्रिको संघटनेकडे पंजिकृत असणे आवश्यक नाही.

> कामाचे नाव :- Manufacturing and Transportation of necessary additional embedment components for erection of Erecton Jig, Vertical anchorages with check nut, Trunion Chair pin with nut, trunion bracket bolt with nut and trunion bo& bearing girder of 12 & 6.5 Radial Gate of Garga Project.

| | |
|---|---|
| > जिल्हा | :- अमरावती |
| > निविदेची किंमत रूपये | :- रू. 23,13,324/- |
| > को-या निविदा संचाची किंमत | :- रू 2,360/- |
| > बयाना रक्कम रूपये | :- रू 24,000/- |
| > सुरक्षा रक्कम रूपये | :- रू. 48,000/- |
| निविदा उपलब्ध कालावधी | :- दि. 03.02.2025 (14.00 वाजता पासून) ते दि. 10.02.2025 (18.00 वाजे पर्यंत) |
| निविदा सादर करण्याचा कालावधी | :- दि. 03.02.2025 (14.00 वाजता पासून) ते दि. 10.02.2025 (18.00 वाजे पर्यंत) |
| निविदा उघडणे | :- दिनांक 12.02.2025 रोजी (14.00 वाजता) शक्य असल्यास किंवा त्यापुढे |

जा.क्र /निविदा/लेशा/2025 दि.
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
प्रमुख द्वार उभारणी पथक क. 2, लिंक रोड सदर नागपूर

(ज्ञा. न. मुठाळ)
कार्यकारी अभियंता,
प्रमुख द्वार उभारणी पथक कर, नागपूर

**क्र/वि.मा.का./अम./जाही./1073/२०२४-२०२५**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# पीएसआय हिट ॲन्ड रन मधील ट्रक चालक ताब्यात

## अपघातानंतर घटनास्थळावरून केले होते पलायन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 )-** पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) संजय गायकवाड यांच्या अपघातानंतर ट्रक घेऊन पसार झालेल्या एका ट्रक चालकाला फ्रेजरपुरा पोलिसांनी ताब्यात घेण्यात मोठे यश मिळविले आहे. या अपघाताबाबत फ्रेजरपुरा पोलिसांकडे कोणताही पुरावा नसताना 48 तासात उच्च दर्जाचे कौशल्य व तांत्रिक ज्ञानाचा वापर करून पोलिसांनी हा गुन्हा उघडकीस आणला आहे.

पोलिस सुत्रानुसार, पोलीस उपनिरीक्षक संजय शंकरराव गायकवाड (वय 57 वर्ष रा. गगलानी नगर, वडाळी, वडाळी गार्डन जवळ, अमरावती) हे डोळ्याचे मोतीबिंदूचे ऑपरेशन झाल्याने गेल्या एक महिन्यापासून वैद्यकीय रजेवर होते. 26 जानेवारी रोजी सकाळी 10:30 वाजताच्या सुमारास ते कर्तव्यावर यवतमाळ येथे रुजू होण्याकरिता मोटारसायकल हिरोहोंडा पॅशन प्रो क्र. एमएच 27 एएल 7222 ने गगलानी नगर येथून निघाले असता त्यांचा पोहराजवळ अपघात झाला. संजय गायकवाड हे मृतावस्थेत रस्त्यावर पडून होते. या घटनेच्या माहितीवरून पोलिसांनी घटनास्थळावर जाऊन चौकशी केली. त्यावेळी लोकांनी सांगितले कि, पांढऱ्या रंगाच्या भरधाव ट्रक ने ओवरटेक करताना एमएच 27 एएल 7222 या क्रमांकाच्या वाहनास धडक दिली व अपघातानंतर ट्रक भरधाव वेगाने तेथून पळून गेला. या घटनेच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपासात घेतला. पोलिसांनी सदर गुन्हाच्या तपासात घटनास्थळी जावून माहिती घेतली. त्यानंतर वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या आदेशाने दोन पथके तयार करून चपरासीपुरा मस्जीत चौक ते पोहरा गावापर्यंतचे सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासले.

### 14 ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज केले एकत्र

पोलिसांनी एकूण 14 ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज एकत्र करून त्याचे तांत्रिक विश्लेषण केले. सदर मार्गाने गेलेल्या वाहनाची पडताळणी करून विवादित वाहनाचा शोध घेतला. संशयीत पांढऱ्या रंगाचा सहा चाकी टाटा ट्रकबाबत अधिक शोध घेतला. पोलिसांनी पांढऱ्या रंगाचा सहा चाकी टाटा अल्ट्रा ट्रक क्रमांक एमएच 27 बीएक्स 8199 डिटेन केला. संशयीत ट्रक चालक साहिल रवींद्र शेवाळे (वय 23 वर्ष रा.ह.मु.राहुल नगर, बिच्छु टेकडी, अंध विद्यालय, अमरावती) यास ताब्यात घेवून विचारपूस केली असता साहिल शेवाळेने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. सदरचा गुन्हा उघडकीस आणताना घटनास्थळावर कोणताही पुरावा नसताना सुद्धा उच्च दर्जाचे कौशल्य व तांत्रिक ज्ञानाचा वापर करून फ्रेजरपुरा पोलिसांनी उत्कृष्ट अशी कामगिरी बजाविली आहे. ही कामगिरी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त सागर पाटील, सहा. पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली फ्रेजरपुरा वरिष्ठ पोलीस निरीक्षक निलेश करे, सहा. पोलीस निरीक्षक रवींद्र सहारे, पोलीस उपनिरीक्षक राहुल महाजन, पोलिस हवालदार योगेश श्रीवास, हरीश बुंदेले, अमोल पाटील, शशिकांत गवई, हरीश चौधरी, रोशन वराडे, जयेश परिवाले यांनी केली.

# हळदी-कुंकू सोहळ्यातून संस्कृतीचे जतन - प्रा. शुभांगी अभ्यंकर

## हंतोडाच्या अभ्यंकर शाळेत कार्यक्रम



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,( दि.30 )** – हळदी-कुंकू सोहळ्यातून परंपरा आणि संस्कृतीचे जतन होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिला एकत्र येतात व आपल्या विचारांची देवाण-घेवाण करतात. त्यातून महिला सशक्तीकरणाला दिशा मिळते. तसेच महिलांमध्ये सामाजिक बांधिलकी व ऐक्याची भावना निर्माण होण्यासही मदत मिळते, असे प्रतिपादन राहुल व्यायाम प्रसारक मंडळाच्या संचालिका प्रा.शुभांगी क्षितिज अभ्यंकर यांनी केले.

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील हंतोडा येथे सुखदेवराव अभ्यंकर विद्यालयात शुभांगी अभ्यंकर यांच्या अध्यक्षतेखाली मकर संक्रांति निमित्त हळदी कुंकवाचा कार्यक्रम नुकताच संस्कार आणि संस्कृती मिलन सोहळा म्हणून पार पडला. त्यावेळी शुभांगी अभ्यंकर बोलत होत्या.

या कार्यक्रमात हंतोडा, मलकापूर, विहीगाव व मुर्हा गावातील विद्यार्थ्यांचे पालक व महिला सहभागी झाले होते. यावेळी महिलांसाठी उखाणे, गवळण गायन, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्व महिलांना संस्थेच्या संचालिका शुभांगी अभ्यंकर, पद्मा ढेपे, मंगला वंजारी यांच्या हस्ते हळदीकुंकू व वाण देण्यात आले. कार्यक्रमाला हंतोडा येथील सरपंच पूजा गोळे, मलकापूरच्या सरपंच रीना काळे, मनीषा हंतोडकर, किरण किरकर, चैताली चव्हाण, भाग्यश्री आठवले, अस्मिता अभ्यंकर, कांचन घंटाघोष, ज्योती खारोडे, सोनू गवळी, कविता हंटोळकर, आरती आठवले, रीना आठवले, जया बहिरे, स्वाती तराळे, सरिता खिरकर, रजनी उईके, रेहाना परवीन, स्वाती वानखडे, शालिनी मोहोळ, दर्शना इंगळे, प्रतिभा सोनवणे, सुशीला आठवले, मंगला उईके, राजनंदिनी वानखडे, रिता कान्हेरकर, मीना खारोडे, दीपा सोळंके, प्रीती मोरे, अनिता आठवले, अर्चना माहुलकर, सुनीता माहुलकर, उज्वला वानखडे, शितल मुरकुटे, संगीता मालटे, सुनिता तायडे, रीना गोळे, चंदा आठवले, वनिता इंगळे प्रामुख्याने उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सारिका वाट, मयुरी लोखंडे, श्रद्धा गोळे, शिला गावंडे यांनी परिश्रम घेतले.

# अचलपुरात मुशायऱ्यातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन

## शेरोशायरी व कवितांनी रसिक मंत्रमुग्ध



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, ( दि. 30 )-** गणतंत्र दिनाचे औचित्य साधून अचलपूर येथे 'एक संध्या हिंदू- मुस्लिम ऐक्याच्या नावाने' या शीर्षकाखाली मुशायरा व कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात शायर व कवींनी सुरेख अशा कविता व शेरोशायरी सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. बज्म ए उर्दू अदब, पावर ऑफ मीडिया आणि पत्रकार संघटनेच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या मुशायऱ्यात सहभागी होण्यासाठी देशभरातून नामवंत शायर व कवींनी अचलपुरात हजेरी लावली होती. त्यामध्ये मध्य प्रदेशातील नवीन अख्तर खादमी, उत्तर प्रदेशचे जुनेद अख्तर, मालेगावचे मुजावर आणि जमील अलमास, अचलपूरचे इम्रान शहर, पुण्याच्या चांदणी मुस्कान, भंडाऱ्याच्या रोशनी अंबर, अकोल्याचे अखिल साहेब आणि इजहार रशीद, नागपूरचे इम्रान फैज, आकोटचे फुरकान नजर, मंगरूळपीरचे अखिल अहमद, बडनेरचे रजा बडनेरवी आणि भोपाळचे शकील नगमी यांचा समावेश होता. त्यांनी सुरेख रचना सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. आबिद हुसेन हे होते. याप्रसंगी माजी बीईओ कलीम सर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. मुशायऱ्याचे उद्घाटन निखिल ठाकरे आणि हाजी अब्दुल रहमान यांच्या हस्ते झाले. यावेळी मंचावर डॉ. शेख करिम, शिवसेना उबाठाचे शहराध्यक्ष गजानन फिसके, सामाजिक कार्यकर्ते जलील पठाण, बंटी केजरीवाल, ईशान इनामदार, शोएब भाई, उबेद सर, जमील सेठ, इकबाल सर, योगेश खांजोळे, सादिक भाई आणि रौफ लेपवाले प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तनवीर अख्तर यांनी केले. या मुशायऱ्याचे संयोजन पत्रकार फिरोज खान, मो. अझहरूद्दीन, इरफान खान, इर्शाद अहमद, सय्यद असलम, मोहीम चव्हाण, सय्यद गाणी यांनी केले होते. यावेळी पत्रकार मोहम्मद अझरुद्दीन, जमील शेठ, डॉ.शेख करिम आणि मास्टर इकबाल यांना दरबान ए उर्दू या सन्मानाने गौरविण्यात आले.

# जनता विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

## विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.30 )** – अंजनगाव बारी येथील जनता विद्यालयात भारतीय प्रजासत्ताक दिन महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त शाळेत विविध कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. मुख्याध्यापक विनोद मुगल आणि पर्यवेक्षक गजेंद्र अवघड यांच्या मार्गदर्शनात हे कार्यक्रम पार पडले.

शालेय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन शाळा समितीचे सभापती सोमेश्वर इंगोले यांच्या हस्ते झाले. कबड्डी, खो-खो, लंगडी, रनिंग, नींबू चमचा आदि क्रीडा प्रकारात या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेची नियोजन रितेश खुळसाम, संतोष पवार यांनी केले होते. तसेच रांगोळी स्पर्धा, हस्तकला स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व विज्ञान प्रदर्शनीही घेण्यात आली. त्यात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. 26 जानेवारी प्रजासत्ताक दिनी सकाळी उत्साहपूर्ण वातावरणात ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाला सभापती महादेव चकुले, न्यू एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजेश टारपे, सोमेश्वर इंगोले, गजेंद्र अवघड, माजी प्राचार्य राजेंद्र पेटले, राजेंद्र निचत, सुमेधा खडसे प्रामुख्याने उपस्थित होते. गेल्या वर्षी पाचवी ते बारावी पर्यंतच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पुरस्कार देऊन यावेळी सत्कार करण्यात आला. विविध स्पर्धांमध्ये विजेता ठरलेल्या विद्यार्थ्यांनाही बक्षीसे देण्यात आली. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर सुरेख नृत्य सादर केले. मोबाईलच्या गैरवापरावर प्रकाश टाकणारे नुक्कड नाटक विद्यार्थ्यांनी प्रस्तुत केले. कार्यक्रमाचे संचालन रितेश खुळसाम यांनी केले. कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व गावातील गणमान्य नागरिक, माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 17 वर्षानंतर एकत्र आले शाळेतले मित्र-मैत्रिणी

## शालेय जीवनातील आठवणींना मिळाला उजाळा | कापूस तळणीच्या संजीवनी विद्यामंदिरात स्नेहसंमेलन



**महासागर प्रतिनिधी**

**कापूसतळणी, ( दि.30 )-** बालपणीची मैत्री अनमोल असते. त्यातच शालेय जीवनात मित्र-मैत्रिणींसोबत निर्माण झालेली नात्यांची विन ही आयुष्यभर तुटत नाही. शाळेतील मित्र-मैत्रिणींसोबत घालवलेल्या क्षणांच्या आठवणी सदैव सोबत राहतात. बरेच वर्षानंतर कधीतरी एकत्र येण्याचा योग आला की त्या क्षणांच्या आठवणी पुन्हा ताज्या होतात. कापूसतळणीच्या संजीवन विद्या मंदिरात 2007 व 2009 च्या दहावी आणि बारावीच्या बॅचमधील विद्यार्थ्यांच्या जीवनात 17 वर्षानंतर एकत्र येण्याचा असाच योग जुळून आला.

या बॅचमधील शितल सायवान, संतोष चिंचोळकर, जीवन धाडे यांनी शालेय मित्र-मैत्रिणींचे दूरध्वनी क्रमांक मिळवून एक सोशल मीडिया ग्रुप तयार केला. त्याद्वारे हे मित्र-मैत्रिणी संपर्कात आलेत. ग्रुपवरील चर्चेदरम्यान मित्र-मैत्रिणींनी एकत्र येऊन स्नेह मेळावा आयोजित करण्याची संकल्पना मांडली. प्रत्यक्ष भेटून जुन्या आठवणींना उजाळा देण्याचा उद्देश त्यामागे होता. अनेकजण आता बाहेरगावी असल्याने एक महिन्याआधी तारीख निश्चित करण्यात आली. 19 जानेवारीचा दिवस उजाडला आणि संजीवनी विद्यामंदिरात 17 वर्षांपूर्वी एका वर्गात शिकलेले हे विद्यार्थी पुन्हा एकदा एकत्र आलेत.

या स्नेह मेळाव्या दरम्यान सर्व विद्यार्थ्यांनी आपले जीवनातील अनुभव कथन केले. अनेक जण आता मोठ्या हुद्द्यावर पोहोचले आहेत. कोणी वैद्यकीय क्षेत्रात सेवा देतोय तर कुणी पोलीस खात्यात जाऊन समाजाचे रक्षण करतोय, काहीजण बँकिंग, अभियांत्रिकी, शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. काहीजण उद्योजक झालेत तर काहींनी शेती करून चरितार्थ चालविण्याचा मार्ग चोखायला. प्रत्येकाने आपल्या जीवनाची वाटचाल कशी झाली याबाबत मनोगतातून कथन केले. या स्नेह मेळाव्याला मेहरे मॅडम, पोहरकर सर, चव्हाण सर यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी 2017 च्या बॅचमधील विद्यार्थी गोपाल नागे, अतुल धारस्कर, शितल सायवान, नितीन येवले, अमित ठाकरे, सोनाली खत्री, योगिता झोड, सागर महानकर, सलीम, सोपान चौधरी, प्रशांत तायडे, अंकुश हाडोळे, कमल शेंडे, भावना आखरे, पुनम वाकोडे, वर्षा लुंगे हे हजर झाले होते.

# विद्यार्थ्यांनी केले ऐतिहासिक शस्त्रास्त्रांचे अवलोकन

## सारडा महाविद्यालयात शस्त्रांची प्रदर्शनी



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,( दि.30 )-** इतिहासात युद्धांमध्ये वापरण्यात आलेली शस्त्रास्त्रे कशी होती, हे समजून घेण्याची उत्सुकता आज सर्वांनाच लागून असते. अंजनगाव सुर्जीच्या विद्यार्थ्यांना ही शस्त्रास्त्रे प्रत्यक्ष पाहण्याची व त्यांचे अवलोकन करण्याची संधी प्राप्त झाली. स्थानिक श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात मानव्यशास्त्र अभ्यास मंडळाद्वारे चांदूर बाजारच्या स्वराज्य सेवा प्रतिष्ठानची प्रसिद्ध इतिहासाचे मुख साक्षीदार विदर्भाचे शस्त्रागार ही ऐतिहासिक शस्त्र प्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. 25 जानेवारीला सकाळी 10 ते सायंकाळी 5 या वेळात या प्रदर्शनीचे महाविद्यालयाच्या मुख्य सभागृहात आयोजन करण्यात आली होते. त्याला विद्यार्थ्यांसोबतच शहरातील नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. या प्रदर्शनीतील शस्त्रास्त्र पाहून आपल्या पूर्वजांनी केलेल्या पराक्रमाची जाणीव महाविद्यालयीन विद्यार्थी व समाजातील सर्व घटकांना व्हावी, हा या प्रदर्शनाच्या आयोजनामागचा उद्देश होता. महाविद्यालयाचे प्रयोगशील प्राचार्य डॉ. वशिष्ठ चौबे यांच्या मार्गदर्शनात ही प्रदर्शनी भरविण्यात आली होती. प्रदर्शनीचे उद्घाटन उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर धुमाळ यांच्या हस्ते झाले. यावेळी तहसीलदार पुष्पा सोळंके दाभेराव, पोलीस निरीक्षक प्रकाश अहिरे, सारडा एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ. अमर सारडा प्रामुख्याने उपस्थित होते. अंजनगाव सुर्जी व परिसरातील प्रतिष्ठित, गणमान्य नागरिक, उद्योजक, व्यावसायिक, पत्रकार तसेच प्रजापिता ब्रह्म कुमारी केंद्राचे प्रमुख ठाकरे गुरुजी यांनी प्रदर्शनीला सदिच्छा भेट दिली. अंजनगाव सुर्जी शहरात प्रथमच अशा प्रकारची वैशिष्ट्यपूर्ण प्रदर्शनी आयोजित केल्याबद्दल नागरिकांकडून आयोजकांची प्रशंशा केली. प्रदर्शनीच्या यशस्वीतेकरिता गोपाल बागडी, मानव्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या सदस्य कविता हिरुळकर मालोकार, प्रा. सुरेंद्र किनीकर, डॉ. प्रवीण आढाव, प्रा. आनंद थोरात, अभ्यास मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्रदर्शनीचे समन्वयक नितीन सराफ, स्वराज्य सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवा काळे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

# माजी सैनिकांसाठी 1 मार्च पर्यंत करता येईल नोंदणी

## जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद पाथरकर यांची माहिती

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.30 )** - सर्व माजी सैनिक, विधवा आणि त्यांच्या अवलंबितांना महासैनिक पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. नोंदणीची अंतिम तारीख 1 मार्च 2025 असून, शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी नोंदणी आवश्यक आहे. महासैनिक पोर्टल (mahasainik.maharashtra.gov.in) ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. या पोर्टलच्या माध्यमातून सैनिक कल्याण विभाग आणि केंद्रीय सैनिक बोर्डाच्या योजनांचा लाभ घेणे सोपे होणार आहे. तसेच, स्पर्श प्रणालीमधील निवृत्ती वेतनविषयक माहिती तत्परतेने सोडवण्यासाठी मदत होणार आहे , असे अमरावती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सेना मेडल (निवृत्त) मेजर आनंद पाथरकर यांनी सांगितले.

नोंदणीसाठी आधार कार्ड, पॅन कार्ड, डिस्चार्ज बुक, पी.पी.ओ., पेन्शन पासबुक, ई.सी.एच.एस. कार्ड, पासपोर्ट साईज फोटो, मोबाईल क्रमांक, शैक्षणिक कागदपत्रे आवश्यक आहेत. नोंदणी शुल्क 100 रुपये असून ते ऑनलाईन पद्धतीने भरावे. अर्ज भरताना सर्व माहिती अचूक आणि स्पष्ट असणे आवश्यक आहे. कागदपत्रे पीडीएफ स्वरूपात अपलोड करावी लागतील. नोंदणीनंतर अर्जाची प्रिंट काढून, मूळ कागदपत्रांसह पडताळणीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अमरावती येथे भेट देणे आवश्यक आहे.

# चिखलदराचे गटविकास अधिकारी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर

## गुरांचे गोठे, बांबू लागवड आणि विकास कामांची पाहणी



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.30 )-** चिखलदरा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शिवशंकर भारसाकळे हे स्वत: तालुक्यातील विकास कामांची पाहणी करण्यासाठी गाव गावचे दौरे करून थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचत आहेत. बांबूची लागवड असो की गुरांचा गोठा तालुक्यात सुरू असलेल्या सर्व विकास कामांवर गटविकास अधिकारी भारसाकळे हे अत्यंत गांभीर्याने लक्ष देत असल्याचे दिसून येत आहे. गटविकास अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांशी सहानुभूतीने चर्चा केली जात आहे. शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व समस्या जाणून घेण्यावर ते भर देत आहेत. कोणत्याही कामासाठी किंवा बिले काढण्यासाठी अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना अजिबात लाच देऊ नये, असे आवाहन भारसाकळे यांनी शेतकरी व नागरिकांना केले आहे. काही अडचण असल्यास थेट फोनवरून आपल्याशी संपर्क साधण्यासही त्यांनी सांगितले. गटविकास अधिकारी भारसाकळे यांच्या या कार्यशैलीवर ग्रामस्थ व शेतकरी समाधान व्यक्त करीत आहेत. शिवशंकर भारसाकळे हे चिखलदरा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी म्हणून रुजू झाल्यापासून त्यांनी तालुक्यात विकास कामांचा धडाका लावला आहे. तालुक्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत विविध प्रकारची विकास कामे मोठ्या प्रमाणावर सुरू करण्यात आली आहे. त्यात बांबू लागवड, गुरांचा गोठा, वृक्ष लागवड आदि कामांचा प्रामुख्याने समावेश आहे. तालुक्यातील जामणी, अंबापाटी, गिरगुटी, चिचखेडा, सोनापूर, गौलखेडा बाजार, वस्तापूर या गावांना गटविकास अधिकारी शिवशंकर भारसाकळे यांनी भेटी दिल्या व तेथील विकास कामांची पाहणी केली.

# घुईखेड येथे श्री संत बेंडोजी महाराज संजीवन समाधी सोहळ्याला सुरूवात

## तिर्थ व कलश स्थापना, अभिषेक, लघुरूद्राभिषेक, होम पुजा नंतर कथेला प्रारंभ ■ 9 फेब्रुवारीपर्यंत चालणार महोत्सव





**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे ( दि. 30 )** – संपूर्ण महाराष्ट्रासह इतर राज्यातील हजारो भाविकांचे श्रध्दास्थान आणि विदर्भातील एकमेव संजिवन समाधी असलेले श्री संत बेंडोजी महाराज यांनी संजिवन समाधी घेतली होती. इ.स. 1337 पासुन बेंडोजी महाराजांचा संजिवन समाधी सोहळा सुरू आहे. या सोहळ्याचे यंदा 688 वे वर्ष असुन आता सोहळ्याला भव्य स्वरूप प्राप्त झाले आहे. अशातच गुरूवार (ता. 30) पासून या सोहळ्याला उत्साहात सुरूवात झाली आहे. 5 फेब्रुवारीला काल्याने किर्तन, शोभायात्रा, दहिहांडी व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यानंतर यात्रा महोत्सव 9 फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. गुरूवारी श्री संत बेंडोजी महाराज मंदिरात तिर्थ स्थापना, कलश स्थापना, अभिषेक, लघुरूद्राभिषेक संस्थानचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर व पत्नी यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर दिनकरराव घुईखेडकर व शशिकांत चौधरी सहपत्नी तसेच प्रा. शैलजा ढोमणे व प्रभाकर ढोमणे (अमरावती) यांच्या हस्ते देवि भागवत कथा व कलश स्थापना झाली. तर विश्वस्त प्रविण घुईखेडकर व पत्नी यांच्या हस्ते होम पुजा करण्यात आली. यानंतर या सोहळ्यातील संगीतमय देवी भागवत कथेला प्रवक्ता ह.भ.प. संगिताताई करंजीकर यांच्या वाणीतुन सुरूवात करण्यात आली. कथेची पूजा हिम्मतराव नाचणे व पत्नी यांच्याहस्ते करण्यात आली. या कथेच्या सप्ताहादरम्यान दररोज सकाळी 9 ते 12 व दुपारी 3 ते 6 वाजतापर्यंत भागवत कथा होणार आहे. याशिवाय दररोज सकाळी 5 ते 6 वाजता सामुदायीक प्रार्थना, काकडा आरती, ग्राम सफाई व गावातून फेरी काढण्यात येत आहे. तर सकाळी 8 वाजता आरती, श्री बेंडोजी बाबा महाराज ग्रंथाचे पारायण वाचन ह.भ.प. निवृत्तीनाथ गोळे, बग्गी हे करीत आहे. यावेळी नंदकिशोर काकडे, संजय काकडे, गजानन फिस्के, बंडू बनकर, डॉ. वानखडे, संगम तायडे, अभय घुईखेडकर, अमोल देशमुख विवेक घुईखेडकर, प्रथमेश गिरी, दादाराव क्षिरसागर प्रशांत काकडे, प्रशांत घुईखेडकर, प्रमोद ढवळे, अनिल शेंडे यांसह अनेक भाविक भक्तांची उपस्थिती होती. महाप्रसाद वाढण्यासाठी गावातील 40 महिलांनी सेवा दिली.

# जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी व माझे पक्षकार नामे 'श्री. प्रफुल मनोहर देशमुख' यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे,

मिळकतीचे वर्णन मौजे तिवसा भाग-1, सर्वे क्रं. 282/7, प्लॉट क्रं. 6, मालमत्ता क्रं. 852, ता. आणि जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार श्री. प्रफुल मनोहर देशमुख यांच्या मालकीचे आहे. तदनंतर, त्यांनी FEDBANK FINANCIAL SERVICES LIMITED येथे गृह कर्जाकरीता अर्ज केला असता वरील वर्णनाचे मूळ खरेदीखत दि. 05/01/2001 रोजीचे दस्त क्र. 23 गहाळ झालेले आहे. तसेच वरील नमूद दस्त कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान/राष्टीयकृत/ खाजगी// पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमतेवीषयी शासकीय-नीमशासकीय इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली देलेल्या माझ्या मोबाइल क्रं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 15 दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

आपला
Advocate
रवींद्र र. वाटाणे
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती
मो. नं. 9823698745